Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्ययन अध्यापनाच्या विकसनासाठी नवीन अध्यापन शास्त्राचा वापर

**श्रीमती अनिता देशमुख ,**

**M.Phill (सन 2014-16)**

**प्रास्ताविक :-**

शिक्षणामध्ये सर्वांना समान शैक्षणिक संधी मिळाली पाहिजे या तत्वानुसार एका गटाला दुस-या गटापेक्षा अधिक शैक्षणिक लाभ मिळता कामा नये म्हणून शिक्षण हक्क कायद्यात तशी तरतूद करण्यात आली. गाव पातळीपासून (शाळा पातळी ) तर महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या बोधात्मक क्रियांचा विकास पूर्ण होणे अपेक्षित आहे.

पाउलो फ्रिअरी या क्रांतीकारी शिक्षणतज्ज्ञाने प्रौढ शिक्षणात अनेक प्रयोग केले. कृतिशील विचारांची जनजागृती त्यांनी समाजात निर्माण केली. त्यांचे प्रयोगातून शिक्षणविषयक विचारांचा विकास करण्यावर भर होता. त्यांनी पेडॅगॉजी ऑफ द ऑप्रेस्ड नावाचा ग्रंथ लिहीला. त्यांनी बँकींग पध्दती व संवाद पध्दतीचे दोष व मर्यादा स्पष्ट केल्या. बँकींग पध्दतीत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव नव्हता. शिक्षकाचे अध्यापन म्हणजे त्याची स्वत:ची श्रेष्ठ प्रतिमा निर्माण करण्यावर होती. संवाद पध्दतीत शिकणारा व शिकवणारा दोघेही सहभागी होते त्यामुळे चिकित्सक विचारांची देवाणघेवाण, कृतिमूलक परिवर्तनाचा विचार, इतरांच्या मनाचा आदर या गोष्टी घडून येतात त्यामुळे शिक्षकाचे अध्यापन एक अंगी न होता कृतिशील संघटकाचे, मार्गदर्शकाचे होतांना दिसून येते.

आजही जुन्या पारंपारिक पध्दतींचा अवलंब शाळा, महाविद्यालयातून दिसून येतो. हे वास्तव बदलण्यासाठी SCERT, NCERT, विविध अभ्यासमंडळे त्या बदलाच्या दिशेने पाऊले उचलतांना दिसून येतात. अध्यापनशास्त्रात प्रश्नपध्दती, चर्चापध्दती, दिग्दर्शनपध्दती, पिअर ग्रुप लर्निंग तसेच विविध माध्यमांचा चित्रालेख, स्पर्श माध्यम, श्राव्य माध्यम व अनेक दृकश्राव्य साधनांचा जसे स्लाईडस्, फिल्मस्ट्रीप्स, पोस्टर्स, टी.व्ही, ICT इ. चा वापर भरपूर प्रमाणात दिसू लागला आहे. परंतू खरेच यापुढेही जाऊन काही नवीन पध्दतींचा शोध घेणे गरजेचे आहे का ? याचा विचार अध्ययन अध्यापनाच्या विकसनासाठी होणे आवश्यक आहे.

❖ **शिक्षक आणि अध्यापनशास्त्र :-**

समाज आणि शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्या परस्परावलंबी आहेत. समाजाचा विकास

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

रावयाचा असेल तर शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा लागेल. शिक्षकाला उत्तमोत्तम शिक्षण द्यावे लागेल. त्यासाठी समाजाची मदत घ्यावी लागेल म्हणजेच परस्पर सहकार्यातून ध्येयसिध्दता होऊ शकेल यासाठी शिक्षकाची भूमिका चांगली वटावी यासाठी शिक्षकाची तयारी करुन घ्यावी लागेल आणि हे काम अध्यापनशास्त्राच्या म्हणजेच शिक्षक शिक्षणाच्या माध्यमातून करावं लागेल.

शिक्षक हे स्वत:च स्वत:चे एक उपकरण आहे. त्याला समाजासमोर प्रेझेंट करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम अध्यापनशास्त्र करते. सध्या शिक्षणसंस्थांचे वारेमाप पीक फुलून आले आहे. देशभर साथीच्या रोगाप्रमाणे पसरलेल्या अशास्त्रीय व अकार्यक्षम संस्था जागोजागी पाहावयास मिळतात. अनुभवी ग्राहकाला या तंत्रज्ञानाच्या इ‍ागमटावर अंधविश्वास ठेवून भागणार नाही तर त्याला आधुनिकता, अद्ययावतपणा, गुणवत्तेची कास धरावी लागणार आहे. यासाठी अध्ययन आणि अध्यापनाच्या विकसनासाठी नवीन अध्यापनशास्त्राची नितांत गरज आहे.

❖ **काही निवडक अध्यापन पध्दती :-**

**1) दूर शिक्षणाची अध्यापन पध्दती :-** मुक्त विद्यापीठांतून ही पध्दती वापरली जाते. सुटीत, विद्यार्थ्यांच्या सोयीने संपर्कसत्राचे आयोजन करण्यात येते. विविध माध्यमे, दूरदर्शन आणि इ-लर्निंगच्या जमान्यात टेली-कान्फरसिंग, इ-कॉन्फरसिंग, एम-कॉन्फरसिंग इ. सुविधा निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयाबाबत मार्गदर्शनाची सुविधा निर्माण झाली आहे. या माध्यमाद्वारे स्वाध्याय तपासून विद्यार्थ्यांना पाठविले जातात, वैयक्तिक मार्गदर्शनाचीही सोय उपलब्ध असल्याने प्रत्याभरण योग्य पध्दतीने होते त्यामुळे अध्ययनात सुलभता प्राप्त होते.

या अध्यापन पध्दतीच्या संरचनेत एकूण 9 घटकांचा समावेश होतो. त्याची एक आकृती आपण बघू या.

दूर शिक्षण संरचना
- → छापील साहित्य उदा स्वाध्याय पुस्तिका, पुस्तके
- → दृकश्राव्य साधणे उदा. स्लाईडस्, फिल्मस्ट्रिप्स
- → रेडिओ आणि दूरदर्शन
- → संगणक सहाय्यित अध्ययन (संगणकावर तयार केलेल्या विविध स्लाईडस्)
- → अभ्यासगट
- → विद्यार्थ्यांचा स्वाध्याय प्रतिसाद
- → विद्यार्थी सेवा-संपर्कसत्रे, ग्रंथालय, प्रयोगशाळा
- → विद्यार्थ्यांसाठी कर्मचारी
- → शैक्षणिक कर्मचारी .

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

वरील संरचना पाहिल्यानंतर शिक्षक शिक्षणात खालीलप्रमाणे गुणवैशिष्टये असावी लागतात.

1) कौशल्याधिष्ठित अध्यापन :- स्वंयअध्ययनाला चालना देणारे, दर्जेदार शिक्षणासाठी अध्ययन साहित्य निर्मिती, अध्ययन साहित्य हे आशय आणि सामाजिक उपयुक्तता असणारे अपेक्षित आहे म्हणजेच उच्च साहित्यनिर्मितीचे कौशल्य व सामाजिक गरजेचे भान असणारी अध्यापनपध्दती यांचे ज्ञान ज्या शास्त्रात आहे असे अध्यापनशास्त्र विकसन करणे गरजेचे आहे.

2) सहकार्याची भावना / वृत्ती :- इतरांची मदत घेऊन आपले कार्य शिक्षकाला यशस्वीपणे पार पाडण्यासाठी असणारे अध्यापनशास्त्र

3) लवचिकता :- यश अन् अपयशाचा स्विकार करून नवनवीन प्रयोग करण्याची क्षमता असलेला शिक्षक प्रशिक्षक निर्माण करण्याची ताकद असलेले अध्यापनशास्त्र .

4) संयम :- अध्ययार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक गरजांची पूर्तता, त्यांच्या क्षमतेनुसार अध्ययन साहित्य, स्वाध्यायनिर्मिती, आत्मविश्वासपूर्वक संयमाने निर्माण करणारे अध्यापनशास्त्र.

5) सर्जनशीलता :- अभ्यासक्रम निर्मितीनासून वितरणापर्यंतचा प्रवास, अध्ययनार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची क्षमता, त्यांना नवीन देण्याची वृत्ती , शिक्षकीपेशा हा उत्तम व्यवसाय आहे हे पटवून देण्याची क्षमता असणारे अध्यापनशास्त्र.

**2) ICT चा वापर :-** सध्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापकांना इंटेलच्या मदतीने ICT चा शिक्षणात प्रभावी वापर याबाबत संगणक प्रशिक्षण दिले जाते. CD ROM च्या सहाय्याने विविध विषयांसाठी अध्ययन अध्यापन साहित्यनिर्मिती सुलभपणे करता येते.

एनसायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिकाचे 36 व्हॉल्युम्स एका CD ROM मध्ये राबविता येतात. अत्यल्प किंमतीत सर्व सोयीसुविधांनीयुक्त प्रभावीपणे अध्यापनासाठी याचा वापर होतो.

शिक्षक शिक्षण संस्थांच्या जाळ्याच्या माध्यमातून करणारे ISAE, DIET, CTE, NCTE, NIEPA, MIEPA, SCERT यामधून याचा वापर झपाटयाने वाढत आहे. ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांना ICT lab देण्याचे काम शासनामार्फत सुरु आहे. तेथील व्याख्याते, अधिव्याख्याते, माध्यमिक शिक्षक सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

इ-कॉन्फरसिंगच्या माध्यमातून विद्यापीठातील तज्ज्ञ मार्गदर्शकांशी विद्यार्थ्यांना संवाद साधणे शक्य झाले आहे असे असले तरी अध्यापनाशास्त्राच्या विकसनात चकवा देणारी गुणवत्ता ही संकल्पना अनुभवता येणे महत्त्वाचे आहे

कारण गुणवत्ता ही ग्राहकांच्या दृष्टीवर अवलंबून असते. ग्राहकाचे जी समाधान करते ती म्हणजे गुणवत्ता. गुणवत्तेचे परिपूर्णता हे गुणवैशिष्टये आहे. तिच्यात सतत गुणात्मक बदल किंवा निरंतर सुधारणा होत असते. त्यासाठी नविन अध्यापनशास्त्रात बदल घडवून आणणे महत्त्वाचे आहे.

❖ **नवीन शैक्षणिक अध्यापनशास्त्राची वैशिष्टये खालीलप्रमाणे असावीत.**

1) जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार असतो या न्यायाने त्याला शिक्षणपध्दतीचा लाभ घेता आला पाहिजे.

2) शिक्षण घेणा-यांवर अमुकच अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची सक्ती नको, त्यामुळे शिकणा-याच्या संधी मर्यादित होतात तसेच नवीन शिक्षण पध्दतीचा उद्देश शिकणा-याचा स्वंय-अध्ययनाचा मार्ग सुकर करणारा असला पाहिजे.

3) ज्यांना स्वत:च्या शिक्षणाच्या लाभात इतरांना सहभागी करून घेण्याची इच्छा असेल अशांचा शिक्षण घेऊ इच्छिणा-यांना शोध घेण्याचा अधिकार असावा.

4) कळीच्या प्रश्नांकडे पोहोचण्याची शैक्षणिक पध्दती अंमलात यावी.

5) सुसंधीचे जाळे निर्माण करणारे, उदा. टेपरेकॉर्डर, विविध वेबसाईटस्, Edusat सारखी योजना व त्याद्वारे होणारे कॉन्फरसिंग नवीन पध्दतीत प्रभावीपणे अंमलात आणावी.

6) ग्रंथालय, प्रयोगशाळा, नकाशे, विश्वकोष, सूक्ष्मदर्शक यंत्रे, अभिजात वाड्मय यांचा मुक्त वापर शिकविणारे अध्यापनशास्त्र असले पाहिजे.

7) शाळाविहीन समाजाच्या स्थापनेसाठी खुले भौतिक वातावरण, शैक्षणिक उपकरणे, शैक्षणिक खेळांचा समावेश असलेले तंत्र यामधील खिलाडूपणा वाढीस लागून निकोप स्पर्धा निर्माण होणेसाठी संधी प्राप्त करून दिल्या पाहिजेत.

8) शिकू इच्छिणारांसाठी खुली शैक्षणिक बाजारपेठ निर्माण करणारे शास्त्र विकसित झाले पाहिजे.

9) मूलभूत कौशल्ये विकसनाबरोबर जीवनाभिमुख ज्ञान देणारे शास्त्र विकसित होणे गरजेचे आहे.

10) Peer group learning (समवस्यकांचे अध्ययन) या शैक्षणिक पध्दतीचा वापर होणे आवश्यक होते. यामधून नवीन जीवन कौशल्य प्राप्तीचा आनंद तर लुटता येईलच पण समान रुची असलेले एकमेकांच्या जवळ येतील त्यामुळे नवनिर्मिती होईल, अध्ययनातील अडथळे दूर होण्यास मदत होईल.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

❖ **ज्ञानरचनावाद** (Constructivism)


सकस आणि प्रयोगशील शिक्षणाचा पाया उभा करण्यासाठी जीन पियाजे या मानसशास्त्रज्ञाने शास्त्रीय दृष्टीकोनातून बौध्दिक विकासाची उपपत्ती मांडली. शिक्षणाच्या सर्व ज्ञान शाखांमध्ये ज्ञ ानरचनावादाने उडी घेतल्याचे दिसून येते.

**ज्ञानरचनावाद संकल्पना व्याख्या व अर्थ :-** "ज्ञानरचनावाद ही संकल्पना अध्ययनार्थी स्वत:साठी वैयक्तिकरित्या किंवा सामूहिकरित्या ज्ञानाची निर्मिती करत असते. यामध्ये अध्ययन करत असतांना परिस्थितीय अनुभवांना महत्त्व दिले जाते."

**अर्थ :-** ज्ञानरचनावादामध्ये अध्ययनार्थी हा ज्ञाननिर्माता (Constructor of Knowledge) असतो. शिक्षकाची भूमिका ही परिस्थिती निर्माण करणे, स्त्रोत पुरविणे (Facilitator, Motivator) ची असते.

अध्ययनार्थी ज्ञानाची निर्मिती अनुभवावर करीत असतो.

ज्ञानरचनावादामध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो.




**ज्ञानरचनावादी अध्ययनाची वैशिष्टये :-**

ऑड्रे ग्रे (Audrey Gray) यांचे मते ज्ञानरचनावादी अध्यापनाची पुढील वैशिष्टये आढळून येतात.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

- अध्ययनार्थी कायम कृतीत दंग
- वर्गवातावरण लोकशाहीयुक्त
- स्वंयअध्ययनास प्रेरणा
- गटकार्यावर भर, चर्चा पध्दती वर भर.
- शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया.
- सहका-यांशी देवाणघेवाण
- प्रायोगिक, कृतीशीलतेला प्राधान्य
- प्रकल्प पध्दतींवर जोर
- क्षेत्रभेटींचा समावेश
- जीवनाभिमुख शिक्षण

डेव्हिड जोनासीन म्हणतात की, ज्ञानरचनावादामध्ये शिक्षकाच्या तीन महत्त्वाच्या भूमिका असतात.

1) आदर्शीकरण (Modeling) 2) कोच ( Coaching) 3) उत्तेजक (Scaffolding)

याशिवाय शिक्षकांनी वेगवेगळ्या प्रश्नांची निर्मिती विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करुन त्यांची जिज्ञासा जागृत करावी यासाठी व्यक्ती अभ्यास , दीर्घकालीन प्रकाश, समस्या केंद्रीत अध्यापन करावे. विद्यार्थ्या ंच्या अनुभवांना प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांना वेगवेगळी बोधात्मक साधने व माहितीचे स्त्रोत माहिती करुन द्यावेत.

समारोप :- आजच्या शैक्षणिक परिस्थितीला दिलेल्या नकारातून शोधलेलं सकारात्मक उत्तर म्हणजे ज्ञानरचना वाद एकंदरीत ज्ञानरचना वादाने शिक्षणाच्या सर्व घटकांवर प्रभाव टाकून संपुर्ण शिक्षण ज्ञानकेंद्रीत केले आहे असे म्हणता येते. तेव्हा नवीन अध्यापन शास्त्रात अध्ययन, अध्यापन पध्दत, शैक्षणिक साधनांची निर्मिती अभ्यासविषयक आणि अभ्यासपुरक कार्यक्रमांचा सुमेळ योग्य साधन तंत्रांचा वापर, अध्ययन अनुभुती, पालक, समाज सहकार्य आणि लोकशाहीयुक्त, भयमुक्त, दडपण विरहीत वातावरणाची सांगड घालून आजच्या शिक्षकास सक्षम करण्यासाठी शासनानं योग्य रितीने पाठबळ दिलं पाहिजे. प्रयोगशिलता आणि गुणवत्ता यांचे जे अतुट नातं सर्वमान्य आहे. हे लक्षात घेऊन शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी अपेक्षित शैक्षणिक परिवर्तनाची वाटचाल गतिमान करणारं ज्ञानार्जन केलं पाहिजे, तरच हे भरकटलेलं वार या स्पर्धात्मक वातावरणात शांत होईल.

**संदर्भ सूची :-**


1) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक **दडपल्या गेलेल्यांची शिक्षणपध्दती.**

2) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक **शाळाविहीन समाज.**

3) बी.बी. पंडीत, डॉ. नलिनी पाटील, डॉ. लता मोटे , **शिक्षक शिक्षण,** नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड के. पब्लिशर्स.

4) डॉ. कविता साळुंखे, विजयकुमार पाईकराव, **शिक्षण आणि अध्यापक शिक्षण :** विकीर्ण चिंतन, शिक्षण प्रशिक्षण प्रकाशन

2) सांगोलकर, अरूण, **नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह,** नाशिक:इनसाईट पब्लिकेशन.

3) पाटील, लीला, **शिक्षणातील लावण्य,** मुंबई : ग्रंथाली प्रकाशन.

4) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2004, 2005. SCERT पुणे